**कारणे दाखवा नोटिस**

कृआआ-२०१८/प्र.म.कृ.सिं.यो./कंनोंनुक/प्र.क्र.०१/११४०/फलो-४
कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,
पुणे - ४११ ००५, दि.१९ नोव्हेंबर ,२०१८
ई मेल आय डी agridrip2015@gmail.com

**विषय** : विक्री पश्चात सेवा केंद्रांवरील कंपनी नियुक्त अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या माहिती बाबत...

कृषि आयुक्तालयाचे आदेश क्र. कृआआ-२०१८/ प्र.म.कृ.सिं.यो./कंनोंनुक/ भाग-१/ प्र.क्र.०१/ ६७५/फलो-४, दि.०९ जुलै २०१८ सोबतच्या परिशिष्ट- १ मध्ये समाविष्ट केलेल्या ०६ ठिबक सिंचन संच उत्पादक कंपन्यांच्या नुतनीकरणास, सन २०१८-१९ साठी मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. परिशिष्ट- १ मधील अनु क्र.०२ वर **मे.पॉलिसिल इरिगेशन सिस्टिम्स प्रा.लि.** २५, माकर चेंबर-३,नरीमन पॉईंट, मुंबई-४०००२१ यांना स्तंभ क्र.८ मध्ये नमुद केल्यानुसार राज्यातील एकूण १२ जिल्हयांसाठी मान्यता देण्यात आलेली आहे.

आपले कंपनीचे दिनांक १९/०९/२०१८ रोजीच्या विनंती अर्जाद्वारे आपले कंपनीस उपरोक्त नमूद नूतनीकरण आदेशानुसार मान्यता मिळालेल्या १२ जिल्हयांमध्ये १४ जिल्हयांची भर घालून एकूण २६ जिल्हयांमध्ये सुक्ष्म सिंचन योजनेचे काम करण्यास मान्यता मिळणे बाबत विनंती केली आहे.

उपरोक्त जिल्हेवाढीसाठी आपण सादर केलेल्या विनंती अर्जासोबत सहपत्रित केलेला कंपनी नियुक्त अधिकारी/कर्मचाऱ्यांचा तपशील पडताळणीसाठी संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या नावासमोर नमूद दूरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांकांवर संपर्क साधला असता, कंपनीने सादर केलेल्या यादीतील सर्व कर्मचारी हे गुजरात राज्यात वास्तव्य करणारे आहेत. तसेच गुजरात राज्यातच कार्यरत आहेत. अशी माहिती यादीत नमूद सर्वच कर्मचाऱ्यांकडून प्राप्त झाली आहे.

तथापि आपण सादर केलेल्या तपशीलानुसार सदर कर्मचाऱ्यांच्या नावासमोर महाराष्ट्रातील जिल्हे नमूद केले आहेत.

यानुसार जिल्हेवाढीसाठी आपण कृषि आयुक्तालयास सादर केलेली माहिती चुकीची अथवा खोटी सादर करुन या कार्यालयाची दिशाभूल करीत असलेचे निदर्शनास येत आहे.

यास्तव आपले कंपनीस दिलेले नूतनीकरणाचे आदेश रद्द का करणेत येऊ नयेत याबाबतचा खुलासा सदरची नोटिस मिळालेपासून १० दिवसांच्या आत सादर करावा. अन्यथा खुलासा सादर न केलेस नियमा नुसार पुढील कार्यवाही करणेत येईल. याची नोंद घ्यावी.

**संचालक फलोत्पादन**
कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे-५

**प्रति,**

**मे.पॉलिसिल इरिगेशन सिस्टिम्स प्रा.लि.**
**२५,माकर चेंबर- ३,नरीमन पॉईंट, मुंबई-४०००२१**
**ई मेल आय डी** dsharma@polysilpipes.com